माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १०३७/२०२१**

**अपिलार्थी, श्री. मंदिप मारोती गोरडवार**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली, ता.जि.गडचिरोली

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली, ता.जि.गडचिरोली

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०२.२०२३**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.१२.२०२० | ०४.०१.२०२१ (हस्तांतरीत) | १८.०१.२०२१ | २२.०२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.१२.२०२०** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " १) गरुड स्वराज्य सेना गडचिरोली संस्थापक मंदिप एम. गोरडवार यांच्या दि. १९.११.२०२० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाही अहवालाच्या सत्यप्रती २) एकूण धर्मकाटा वाढविण्यात आले याबाबत कागदपत्रासहित माहिती ३) कृषी गोदामाची संख्या ४) अपूर्ण बांधकाम असलेल्या कृषी गोदामाची संख्या ५) अंदाजपत्रकानुसार बांधकाम कृषी गोदामाची न करणा-या कंत्राटदार व अधिका-यावर केलेल्या कार्यवाहीची नस्तीसहीत सत्यप्रती " इ. ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक ०४.०१.२०२१ रोजी १) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ गडचिरोली २) जन माहिती अधिकारी, जिल्हा मार्केटींग अधिकारी, गडचिरोली ३) जन माहिती अधिकारी उप प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ अहेरी यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानुसार प्रादेशिक व्यवस्थापक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या. गडचिरोली यांनी दिनांक २८.०१.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यात त्यांनी मुद्दा क्र. १ व २ बाबत सदरची माहिती या कार्यालयांशी संबंधित नाही. मुद्दा क्र. ३ बाबत सदरची माहिती कृषी विभागाशी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. ४ बाबत सदरची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग गडचिरोली

कार्यालयाशी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. ५ ची माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून कृषी विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे.

तत्पूर्वीच अपिलार्थी यांनी व्यथित होऊन **दिनांक १८.०१.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती वेळेत न दिल्यामुळे " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २२.०२.२०२१ अन्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागितलेली माहिती करीता अर्जदार सुनावणीस उपस्थित होते. अपिलामध्ये सदर अपिलार्थीने सुनावणी दरम्यान समाधान झाल्याचे कबुल केले. तसेच सुनावणी दरम्यान सदर अर्ज ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाला पत्र देऊन सदर माहिती तात्काळ अपिलार्थी यांना देण्याकरीता आदेशित करुन अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे आदेशित केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०६.०४.२०२१ रोजी** " माहिती दिलेली नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १९.०४.२०२१ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १३.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा खरेदी अधिकारी, श्री. गजानन कोकडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२०२० रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक ०४.०१.२०२१ रोजी १) जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ गडचिरोली २) जन माहिती अधिकारी, जिल्हा मार्केटींग अधिकारी, गडचिरोली ३) जन माहिती अधिकारी उप प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ अहेरी यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानुसार प्रादेशिक व्यवस्थापक, म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्या. गडचिरोली यांनी दिनांक २८.०१.२०२१ रोजी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे. त्यात त्यांनी मुद्दा क्र. १ व २ बाबत सदरची माहिती या कार्यालयांशी संबंधित नाही. मुद्दा क्र. ३ बांबत सदरची माहिती कृषी विभागाशी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. ४ बाबत सदरची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग गडचिरोली कार्यालयाशी संबंधित आहे. तसेच मुद्दा क्र. ५ ची माहिती या कार्यालयाशी संबंधित नसून कृषी विभाग व सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित असल्याचे नमूद केले आहे. त्याविरुध्द प्रथम अपील दाखल केले आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १८.०२.२०२१ रोजी सुनावणी घेवून दिनांक २२.०२.२०२१ अन्वये, सदर अर्ज ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाला पत्र देऊन सदर माहिती तात्काळ अपिलार्थी यांना देण्याकरीता आदेशित करुन अर्ज नस्तीबध्द केला आहे. वरील आदेशाची प्रत १) प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, गडचिरोली २) जिल्हा मार्केटिंग अधिकारी, गडचिरोली ३) उप प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ अहेरी यांना अग्रेषित करुन त्यांनी संबंधित अर्जदाराच्या दि. १८.१२.२०२० रोजीचा अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(३) नुसार अर्ज आपल्या कार्यालयास स्थानांतरीत केलेल्या अर्जावर तात्काळ कार्यवाही करुन आपल्या कार्यालयाशी संबंधित माहिती तात्काळ विना मोबदला अर्जदारास



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

पुरविण्यात यावी, असे आदेशित केले. तसेच सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली २) जिल्हा कृषी अधिकारी, जि.प. गडचिरोली ३) जिल्हा परिषद बांधकाम विभाग गडचिरोली ४) निरीक्षण वैध मापण शास्त्र गडचिरोली, विभाग गडचिरोली यांना माहितीस तथा या आदेशाव्दारे अर्जदार श्री. मंदिप मारोती गोरडवार मु. पुलखल, पो. कनेरी ता.जि.गडचिरोली यांचा दिनांक १८.१२.२०२० च्या अर्ज सोबत जोडण्यात येत असून अर्जामध्ये आपल्या कार्यालयाशी संबंधित मागितलेली माहिती तात्काळ ५ दिवसाच्या आत अर्जदारास पुरविण्यात यावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावे, असे आदेशित केले. त्याअनुषंगाने अपिलार्थी यांना दिनांक २८.०१.२०२१ व दिनांक ०३.०३.२०२१ रोजी काही विभागाने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस प्रदान केलेली असून त्याचे अवलोकन केले असता, अतिशय त्रोटक व असमाधानकारक माहिती प्रदान केली असल्याचे आढळून येते.

अपिलार्थी यांच्या दिनांक १९.११.२०२० रोजीच्या निवेदनामध्ये नमूद केलेले विषय हे अतिशय गंभीर असून त्यात धान विक्री केंद्रावर शेतकऱ्यांची गैरसोय न होण्याकरीता, धर्मकाटा व हमालांची संख्या वाढविणे तसेच गोदामाची व्यवस्था पुर्वतयारी करण्याबाबत नमूद केले आहे. या प्रकरणात शासनाच्या विविध प्राधिकरणाची जबाबदारी असल्याची गंभीर बाब आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २(च) नुसार तांत्रिक दृष्टीचा वापर करुन अपिलार्थीस माहिती न पुरविणे हे पारदर्शक प्रशासनाला क्वचितच भुषावह नाही. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांच्या दिनांक १९.११.२०२० रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी गडचिरोली व मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर यांनी त्यांच्या प्रशासकीय स्तरावर प्रचलित नियमानुसार विहीत मुदतीत योग्य ती दखल घेवून यंत्रणा दुरुस्त करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती पाउुले उचलावी व त्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा व त्याची एक प्रत अपिलार्थीस सादर करावी. सदर आदेशाची प्रत अपिलार्थी यांच्या दिनांक १९.११.२०२० रोजीच्या निवेदनासह मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर व मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे.

**आदेश**

**उपरोक्त आदेशाच्या अधीन राहून, अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.०२.२०२३**

**प्रत,**

**मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग नागपूर व मा.जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना सदर आदेशाची प्रत अपिलार्थी यांच्या दिनांक १९.११.२०२० रोजीच्या निवेदनासह उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित करण्यात येत आहे.**

जावक क्रमांक E0108 ---- दिनांक 31 OCT 2023